# श्रीमती ना. दा. ठा. महिला विद्यापीठ,

१, ना. ठा. मार्ग, न्यु मरिन लाईन्स्, चर्चगेट, मुंबई - २०.

## विशेष कक्ष


जा.क्र. विशेष कक्ष/अ-३९/२०२४-२५/ ५२ दि. २३.०७.२०२४

**परिपत्रक**

प्रती,

मा. प्राचार्य/विभाग प्रमुख/प्रभारी/संचालक,

विद्यापीठ संचलित महाविद्यालये/विभाग/सेंटर/इंस्टिटयूट, चर्चगेट, जुहू, पुणे व श्रीवर्धन कॅम्पस्,

तसेच विद्यापीठ संलग्न महाविद्यालये/नोंदणीकृत संस्था, महाराष्ट्र राज्य,

श्रीमती ना. दा. ठा. महिला विद्यापीठ, मुंबई

विषय : व्यावसायिक अभ्यासक्रमास प्रवेश घेणा-या आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (EWS), सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग (SEBC) तसेच इतर मागासवर्ग (OBC) या प्रवर्गातील मुलींना शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्काच्या ५० टक्के ऐवजी १०० टक्के लाभ मंजूर करणेबाबत...

संदर्भ : १) उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय शासन निर्णय क्र. शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.१०५/तांशि-४, दि. ०८ जुलै, २०२४

२) मा. प्र. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे परिपत्रक क्र. उशिसं/शिष्य-२०२४-२५/मुमोशि/३८५३, दि. १९ जुलै, २०२४

महोदया/महोदय,

कृपया उपरोक्त विषयांकित संदर्भीय शासन निर्णय व शासन परिपत्रक पहावे. सदर शासन निर्णय माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव सोबत पाठविण्यात येत आहे.

सुचित करण्यात येते की, मा. प्र. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या संदर्भाधीन दि. १९ जुलै, २०२४ च्या परिपत्रकातील निर्देशांप्रमाणे विषयांकित योजनेची काटेकोर अंमलबजावणी करावी. महाविद्यालय स्तरावर विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती योजनांबाबत माहिती तसेच विद्यार्थ्यांना येणा-या अडचणींचे निराकरण करणेकरीता महाविद्यालयामधील जाणकार अध्यापकाची 'स्कॉलरशिप नोडल ऑफिसर' म्हणून नेमणूक करण्यात यावी. तसेच त्याच्या अधिपत्याखाली स्वतंत्र शिष्यवृत्ती कक्ष निर्माण करण्यात यावा, असे निर्देश प्राप्त आहेत.

याअनुषंगाने कळविण्यात येते की, विद्यापीठ संचलित व संलग्न महाविद्यालये तसेच विद्यापीठाचे विविध शैक्षणिक विभागांमध्ये, विद्यार्थीनींच्या शिष्यवृत्ती अर्जांची पडताळणी प्रथम 'लिपिक' स्तरावर व तद्नंतर संबंधीत प्राचार्य/विभागप्रमुख यांच्या स्तरावर केली जाते. त्याप्रमाणे महाविद्यालये/विभाग यांचे प्राचार्य/विभागप्रमुख/जाणकार अध्यापक हे आपल्या संबंधीत महाविद्यालय/विभागापुरते 'स्कॉलरशिप नोडल ऑफिसर' म्हणून काम पाहतील. तसेच ज्याठिकाणी एकापेक्षा जास्त पद्व्यूत्तर विभाग मिळून सामाईक 'समन्वयक' कार्यरत आहे, अशा ठिकाणी संबंधीत समन्वयक हा 'स्कॉलरशिप नोडल ऑफिसर' म्हणून काम पाहतील. तसेच त्यांच्या अधिपत्याखाली स्वतंत्र शिष्यवृत्ती कक्ष असावा.

आपल्या महाविद्यालय/विभागांतील 'स्कॉलरशिप नोडल ऑफिसर' यांचे नांव, पदनाम व संपर्क क्र. याबाबतची माहिती संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण आणि कुलसचिव, श्री.ना.दा.ठा. महिला विद्यापीठ, मुंबई यांचेकडे तात्काळ सादर करावी. मुलींना मोफत शिक्षण या योजनेच्या अंमलबजावणीबाबत केलेल्या कार्यवाहीबाबत वेळोवेळी संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना अहवाल सादर करावा. कोणतीही पात्र विद्यार्थीनी या योजनेपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी.

कळावे.

आपला,

(डॉ. विलास नांदवडेकर)

कुलसचिव

प्रत : १) शैक्षणिक विभाग, चर्चगेट २) संलग्नता विभाग, चर्चगेट